# भारतीय जनतेचे आरोग्य आणि औषधी उद्योग

ऑप्पी (OPPI) ऑर्गनायझेशन ऑफ फॉर्म्यासिटिकल प्रोड्युसर्स ऑफ इंडिया या संस्थेने १९७२ मध्ये एक पुस्तिका प्रसिद्ध केली. या पुस्तिकेमध्ये भारतीय जनतेच्या आरोग्यबाबत आणि देशातील औषधी उत्पादनांसंबंधी खूपच उद्बोधक माहिती आली आहे. देशातील जनतेचे आरोग्य सुधारण्यात औषधी उद्योगाचे स्थान किती मोलाचे आहे हे जनसामान्यांच्या मनावर बिंबविण्याचा या पुस्तिकेच्या संपादकाचा उद्देश दिसतो आहे. त्या पुस्तिकेमध्ये काय काय माहिती आले त्याचा परिचय करून घ्यायला हवा. भारतीय जनतेचे आरोग्य ही एक राष्ट्रीय संपदा समजली पाहिजे राष्ट्रीय नैसर्गिक संपदेचा विकास इत्यादी कार्यक्रमाप्रमाणे आरोग्याकडेही देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. आरोग्य संपन्न नागरीक, कामगार, शेतकरी साहजिकच अधिक चांगले काम करून पर्यायाने देशाच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावणार. जनतेच्या आरोग्याची लक्षणे तरी कोणती असा प्रश्न उपस्थित होतो. सरासरी आयुर्मान, बालमृत्यूचे प्रमाण, जन्म व मृत्यूचे प्रमाण या कांही कसोट्यांच्या दृष्टीने १९४५ ते १९७० या २५ वर्षात काय फरक पडला आहे ते पाहू. (१९४५/१९७०) जन्म प्रमाण दर हजारी– ३९.९/३८.६ मृत्यू प्रमाण दर हजारी २७.४/१४ बाल मृत्यू दर हजारी १८३/११३ सरासरी आयुर्मर्यादा (वर्षे) ३२.१/५२.६ बालमृत्यू आणि एकूण मृत्यू प्रमाणामध्ये घट लक्षणीय आहे. आयुर्मर्यादा ही वाढलेली दिसते. साथीचे रोग जनतेच्या आरोग्याचे शत्रूच मानले पाहिजेत. वेगवेगळ्या साथीच्या रोगांना बळी पडणाऱ्या लोकसंख्येच्या आकड्यावरूनही स्वास्थ्याच्या सुधारण्याची कल्पना येऊ शकते. एक लक्ष लोकसंख्येमध्ये साथ रोगांना बळी पडलेल्यांची आकडेवारी १९४५ आणि १९७० ची अशी आहे. (१९४५/१९७०) कॉलरा – ९३/०.६ देवी – ५०/०.२ प्लेग –१०/०.० अमांश– ८०/४६ (१९६५) फुफ्फुसाचे रोग– १५०/८३ (१९६५) जनतेचे आरोग्य रक्षण आणि संवर्धन हे कल्याणकारी शासनाचे उद्दिष्ट असायला हवे म्हणून सरकारने नियोजन मंडळ स्थापन करून, पंचवार्षिक योजनांच्या स्वरूपात, भरपूर पैसा खर्च केला त्याचे आकडे असे आहेत. १ ली पंचवार्षिक योजना– १४० कोटी. २ री – २२५, ३ री– ३४२, ४ थी – ९३२. सरकारने आरोग्याच्या विविध योजनांवर चौथ्या पंचवार्षिक योजनेत खूप खर्च केला. सार्वजनिक आरोग्य आणि पाणीपुरवठा – ३३९ कोटी, रुग्णालये, दवाखाने आणि फिरती सेवारुग्णालये – ११६ कोटी, साथीच्या रोगांचे नियंत्रण– १२७ कोटी, कुटुंब नियोजन – ३०० कोटी. १९५० साली १०००० रुग्णालयामध्ये १,२५००० रुग्णशय्या होत्या पण १९६० मध्ये १४६०० रुग्णालये झाली आणि २,५५,७०० रुग्णशय्या झाल्या. ४२ वैद्यकीय महाविद्यालये १०३ झाली. विद्यार्थी संख्या ३५०० पासून १३००० पर्यंत वाढली. याच बरोबर आता औषधी उद्योगाने काय प्रगती केली ते पाहूया भांडवली गुंतवणूक १९५० च्या सुमानास २० कोटी होती ती १९७० मध्ये दसपट झाली. लहान व मोठ्या कारखान्यांची संख्या १६४३ व ७५ होती ती २१३९ व ११८ झाली. मोठ्या कारखान्यात ६०००० कर्मचारी आहेत तर २००० पेक्षा जास्त असलेल्या छोट्या कारखान्यात ४०००० हून जास्त लोकांना रोजगार उपलब्ध झाला. पॅकिंग, लेबल छपाई, औषधांचा प्रचार व विक्री आहे सर्व मिळून जवळ २,७५,००० कुटुंबांचे पोषण हा व्यवसाय करतो. १९४८ मध्ये या उद्योगाचे उत्पादन केवळ १० कोटींचे होते ते आता ३०० कोटीवर गेले आहे. १९५० मध्ये आपली औषधांची निर्यात जवळजवळ नव्हतीच. पण १९६० साली इंग्लंड, अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया इथे एक कोटी रुपयाहूनही अधिक निर्यात झाली. तरीही बाकीच्या सुधारलेल्या देशांच्या तुलनेत आपण या विषयात अजूनही मागे आहोत. १९६६ च्या सुमारास भारतात केवळ ३.६२ रुपयांची औषधे वापरली जात होती तेव्हा जर्मन १४६ व अमेरिकन व्यक्ती १९३ रुपयांची औषधे वापरत होता.

◆

**अ. मा. लेले**